# अफगाणिस्तानातील 'बच्चाबाझी', अमेरिकेतील Q-anon आणि फ्रान्समधील हत्या

पुरन्दरे चन्द्रशेखर

बच्चाबाझी ही अनिष्ट प्रथा अफगाणिस्तानात आहे. बच्चाबाझी म्हणजे प्रौढ पुरुषांचे अल्पवयीन मुलग्यांशी शरीरसंबंध. ६ ते १८ वयाची अतिशय गरीब कुटुंबातील मुलगे या प्रथेचे बळी असतात. लष्करी अधिकारी, पोलीस अधिकारी, जमीनदार हा सत्ताधारी वर्ग असे मुलगे 'ठेवतो'. या मुलग्यांना मुलीचे कपडे घालून मालक आणि त्याच्या मित्रांच्या 'करमणुकीसाठी' प्रसंगी नाच करायलाही लावले जाते. कधीकधी त्यांचा लिलाव करण्यात येतो आणि जास्तीत जास्त 'बोली' करणाऱ्याला ती विकलीही जातात. मालक बलिष्ठ असल्याने त्याच्याविरुद्ध आवाज उठवायला लोक घाबरतात. तसेच हे प्रकरण उघड झाल्यास कुटुंबाची बेइज्जत होईल अशी शरम असते. २०१७च्या कायद्यानुसार आज ही प्रथा हा गुन्हा आहे. [म्हणजे कायदाही उशीरा आला.] पण ती चालू आहे. काही वेळा गरीब कुटुंबेही पोसायला एक सदस्य कमी म्हणून मुलगा विकतात. अशा दीर्घकालीन बळजबरीने मुलांच्यात आयुष्यभरासाठी गंभीर शारीरिक व मानसिक विकार निर्माण होतात. बहुधा विशीत आल्यावर असा तरुण आपल्यासाठी बच्चा शोधतो आणि परंपरा चालू रहाते. स्त्री ही मुलांना जन्म देण्यासाठी असते तर मुलगे भोगण्यासाठी असतात या विश्वासावर परंपरा आधारित आहे.

तलेबानच्या उदयानंतर या प्रथेला नवीन वळण लागले. पोलीस किंवा लष्कराच्या चेक-पोस्टमध्ये तलेबान बच्चे पाठवते. सैनिकांना तो मोह टाळता येत नाही आणि बच्चाबाझी सुरू होते. अशा मुलांनी काही काळानंतर त्याच ठाण्यातील पोलिसांची किंवा सैनिकांची गोळ्या घालून हत्या केलेली आहे कारण ते तलेबानचे हस्तक असतात आणि साचलेला द्वेष बाहेर येतो.

ही प्रथा व त्याविषयीचा प्रस्थापितांचा दृष्टिकोन किती खोलवर रुजलेला आहे हे एका अहवालाने स्पष्ट केले. मागच्या नोव्हेंबरमध्ये पूर्व अफगाणिस्तानातील लोगार नावाच्या प्रांतातील अशा अत्याचारांच्या तपासणीतून हा अहवाल बाहेर आला. त्यानुसार या प्रांतातील शाळांमध्ये मुख्याध्यापकापासून खालच्या शिक्षकांपर्यंत, पोलिसांतर्फे विद्यार्थ्यांवर सर्रास बलात्कार होत असत. सर्वेक्षण फक्त तीन शाळांचे होते पण त्या शाळांतील १६५ मुलांनी त्या प्रांतातील बाल-हक्क समितीपुढे हे प्रकार नोंदवले. एका शिक्षकाने एका विद्यार्थ्याला परीक्षेत पास करण्याची हमी दिली. या उपकाराची परतफेड म्हणून त्याला शिक्षकाची 'एक छोटी विनंती' मान्य करावी लागली. मग त्याला लायब्ररीत नेऊन शिक्षकाने त्याच्यावर बलात्कार केला. मुख्याध्यापकाने दुसऱ्या एका मुलावर बलात्कार केला. हा प्रकार कोणास सांगितला तर त्याला जीवे मारण्याची धमकी दिली. ही तपासणी करणाऱ्या समितीच्या दोन सभासदांना अफगाणिस्तानच्या केंद्रीय इंटेलिजन्स विभागाने लगेच ताब्यात घेतले आणि अहवालातील आरोप सार्वजनिकरीत्या मागे घ्यायला लावले. अफगाणिस्तानातील अमेरिकन दूतावास आणि तेथील मानवी हक्क संघटनांच्या हस्तक्षेपानंतर या दोघांची सुटका झाली. त्यातील एकाने देश सोडला.

आजवर मुलगा स्वत:हून अत्याचाराला हवाली करणारी तुरळक कुटुंबे सोडता बहुसंख्य लोक ही प्रथा सहन करत आले आहेत. ज्या काही अपवादात्मकवेळी याविरुद्ध तक्रार केलीच तर काही उपयोग होत नाही हे लोकांच्या मनात ठसले आहे.

अशा पार्श्वभूमीवर सप्टेंबरमधील एक घटना पहायला हवी. तेरा वर्षांच्या दोन मुलांचे एकाच्या बागेतील डाळिंबे दुसऱ्याने चोरली, झाडाची नासधूस केली या कारणावरून भांडण झाले.

नसीबुल्ला बरकझाई हा त्यातील एक मुलगा. पोलिसांनी दुसऱ्या मुलाची बाजू घेतली व नसीबुल्लाला ताब्यात घेतले. दोन दिवसातच, १८ सप्टेंबरला, त्याचा मृत्यू झाला. पोलिसांनी त्याचे हाल करून त्याच्यावर अनेकदा बलात्कार केला होता. त्याला त्यांनी जखमी अवस्थेत हॉस्पिटलमध्ये नेला आणि तो छतावरून पडला अशी बतावणी केली. पण त्याला तपासणाऱ्या डॉक्टरच्या मते त्याच्या अंतर्गत जखमा बलात्काराच्या होत्या. एरवी ही घटना 'नेहेमीचीच' म्हणून लोकांनी सहन केली असती, जसे ते पिढ्यानपिढ्या करत आलेले आहेत. पण यावेळी सगळे गाव प्रांताच्या गव्हर्नरच्या ऑफिसला गेले. त्यांनी ठाण्याच्या प्रमुखाला व त्याच्या सहकाऱ्यांना या कृत्याबद्दल जबाबदार धरावे अशी मागणी केली. विशेष म्हणजे, ही मागणी गव्हर्नरने मान्य केली. ठाण्याचा प्रमुख आणि सहा सहकारी आता तुरुंगात आहेत. त्यांची चौकशी चालू आहे.

चौकशीतून निष्पन्न काय होणार, गुन्हेगारांना शिक्षा होईल का याबाबत नसीबुल्लाचे कुटुंबीय साशंक आहेत. आपल्या-कडच्या सारखाच एक न्याय दुर्बलांना आणि दुसरा बलिष्ठ वर्गाला ही भावना पक्की आहे.

या घटनेचे महत्त्व प्रामुख्याने सांकेतिक आहे. शोषित अखेर अशा पाशवी सत्तेविरुद्ध आवाज उठवतात हीच अफगाणिस्तानात अभूतपूर्व प्रगती आहे.

## Q-anon

या नावाचा नवीन पंथ अमेरिकेत उभा रहात आहे. तो पूर्णत: अंधश्रद्धेवर आधारित आहे. अमेरिकेसारख्या तथाकथित प्रगत देशात अंधश्रद्धेचा पगडा किती शाबूत आहे, ते या पंथावरून दिसून येते. इथे दखल घेण्याचे ते एक कारण. दुसरे म्हणजे हा पंथ बृहत्समाजाला श्रेयस्कर नाही. अजूनही अमेरिकेचे जागतिक सामर्थ्य पहाता जगासाठीही तो श्रेयस्कर नाही.

या पंथाचा उदय गेल्या दोन-तीन वर्षातला. तो संपूर्णपणे इंटरनेटवर वाढला व वाढत आहे. त्याची काही गृहीतके अशी : एक प्रचंड कट जग चालवतो. हा कट मोजक्या लोकांनी रचला आहे. ते लोक जगातील अतिश्रीमंत व मुख्यत: ज्यू आहेत. ते सैतानाचे उपासक आहेत. ते देवाला नष्ट करायला निघाले आहेत. विशेषकरून जगभरच्या लहान मुलांना पळवणे, त्यांची हत्या करणे हा या कटाचा भाग आहे. घाबरलेल्या लहान मुलांच्या हत्येनंतर त्यांच्या रक्तातून अद्रेनोक्रोम नावाचे द्रव्य मिळते. ते प्राशन केल्यास दीर्घायुष्य लाभते, अद्‌भुत मानसिक अनुभव येतात इ. या कारस्थानी मंडळींचा विश्वास आहे; लहान मुलांवरील लैंगिक व इतर अत्याचार हाही या कटाचा अविभाज्य भाग आहे. हॉलीवूडमधील अनेक लोक-नट, नट्या, निर्माते; डेमोक्रॅटिक या ट्रम्पविरोधी पक्षाचे अनेक राजकारणी वगैरे लोक या कटात सामील आहेत. जगातील पैसा व सत्ता या लोकांच्या हातात एकवटले आहेत आणि पडद्यामागून ते जग नियंत्रित करतात. हे लोक हा जगाला धोका आहे. त्यांचा नाश करणे हे Q-anon चे ध्येय आहे.

कोणत्याही काळात, कोणत्याही समाजात जगातील घडामोडींच्या मागे एक अदृश्य पण सुसूत्र आंतरराष्ट्रीय कट असतो अशी अंधश्रद्धा दिसून येते. जोपर्यंत ती अंधश्रद्धा त्या भाविकांपर्यंत मर्यादित असते आणि एकूण समाजाला फारसा धक्का लावत नाही तोपर्यंत ती सह्य असावी. उदा. श्रद्धाळू सिद्धिविनायकाला नवस करतात. पण ती जग, किंवा सभोवताल आपल्या कल्पनेकडे वळवण्यासाठी इतरांवर हिंसक मार्ग स्वीकारायला कचरत नाही तेव्हा ती सामाजिक समस्या होते, तो देशासाठी कायदा आणि सुरक्षेचा प्रश्न होतो. Q-anon ही मर्यादा उल्लंघत आहे.

अति-उजव्या हिंसक इतर धर्मीय आतंकवाद्यांच्यात आणि या पंथीयांच्यात तत्त्वत: फरक नाही. त्यांची श्रद्धा न मानणारे सैतानाचे भक्त आहेत, त्यांना नष्ट करा हा त्यांच्या मतेही दैवी आदेश, दैवी कर्तव्य आहे. त्यात भर म्हणून ट्रम्पसारखे उथळ नेतृत्व अमेरिकेला लाभले आहे. कोणत्याही मार्गाने परत राष्ट्राध्यक्ष होण्यासाठी या गृहस्थाला सामाजिक उत्तरदायित्व, नीतीमत्ता आड येत नाहीत. त्यामुळे या पंथाच्या लोकांना प्रोत्साहन मिळत आहे. आगामी राष्ट्राध्यक्षीय निवडणुकीसाठी त्यांना ट्रम्पचा भरोसा वाटणे साहजिक आहे. त्यांच्या श्रद्धेनुसार संपूर्ण विनाशापासून ट्रम्पच अमेरिकेला [आणि जगाला] वाचवू शकेल. त्याला या कटाची पूर्ण माहिती आहे. त्याचा रिपब्लिकन पक्ष देवाचे सतत नाव घेतो तर विरोधी

डेमोक्रॅटिक पक्ष अंधाराचाच धोशा लावतो. ट्रम्प सत्तेवर येताच अमेरिकन लष्कराच्या मदतीने तो या अश्रद्धांचा नि:पात करेल व जगाची नवी घडी बसवेल, इत्यादी.

हा पंथ समाजाच्या परिघावर असता तर त्याच्याकडे दुर्लक्ष करता आले असते पण तो आता मुख्य प्रवाहात सामील होत आहे. अमेरिकेच्या Federal Bureau of Investigation च्या पाहणीनुसार हा पंथ हिंसाचाराला अनुकूल आहे. [त्याने काही हिंसाचार केलेलेही आहेत.] अशा पंथांबाबत अधिकृत आकडेवारी मिळणे अशक्य असते पण या पंथाचे आजमितीला अमेरिकेत काही लाख अनुयायी असावेत. त्यात काही राजकारणीही आहेत.

दुर्दैवाने या पंथाला आता जर्मनीतही अनुयायी मोठ्या प्रमाणावर मिळत आहेत.

या संदर्भात नोंद घेण्यासारखी एक भयानक घटना पॅरिसमध्ये १६ ऑक्टोबरला घडली. तिचा उगम २०१५च्या एका घटनेत आहे. तेव्हा फ्रान्समधील शार्ली हेब्दो नावाच्या नियत-कालिकाने प्रेषित मोहम्मदाची कार्टून्स प्रकाशित केली होती. इस्लामच्या या अपमानाचा सूड म्हणून मुस्लिम अतिरेक्यांनी त्या नियतकालिकावर व इतरत्र विशेषत: ज्यू दुकानांवर पूर्व-नियोजित हल्ले केले व अनेक लोकांना ठार मारले. अभिव्यक्ति-स्वातंत्र्याचे उदाहरण म्हणून ही व्यंगचित्रे पॅरिसमधील एका शाळेत इतिहासाच्या शिक्षकाने मुलांना दाखवली. हा इस्लामचा अपमान झाला. त्याची शिक्षा म्हणून शिक्षकाला १८ वर्षाच्या मुस्लिमाने शाळेजवळ आधी सुरीने भोसकले व नंतर त्याचा शिरच्छेद केला. हा इसम चेचेन या रशियाच्या कडव्या मुस्लिम प्रांतातून फ्रान्सला आला होता. त्याला पोलिसांनी घटनास्थळी ठार मारले. या घटनेने देशात प्रचंड खळबळ माजली आहे.

Q-anon चा प्रवास अनिर्बंधित चालू राहिला तर भावी दिशा पॅरिसच्या घटनेनुसार स्पष्ट होते. २१व्या शतकातील ही मानवी प्रगती आहे.

www.purandarearts.com
www.art-non-deco.com
artnondeco@yahoo.co.uk